# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.02.2025** **वार- शुक्रवार**

---

**स्वारगेट अत्याचार**

पुण्यातील स्वारगेट बस स्थानक महिला अत्याचार प्रकरणी पोलिसांनी आरोपी दत्तात्रय गाडे याला शिरूर तालुक्यातील गुनाट गावातून काल मध्यरात्री अटक करण्यात आल्याचं पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी आज सांगितलं. गेल्या दोन दिवसांपासून फरार असलेला आरोपी दत्तात्रय गाडेला अटक करण्यासाठी पोलिसांनी ड्रोनचाही वापर केला. 500 पोलिस कर्मचारी या तपासासाठी तैनात करण्यात आले होते. या प्रकरणी स्थानिक नागरिकाचं सहकार्य मिळालं. त्याचबरोबर श्वान पथकाचीही मदत घेण्यात आली. असं त्यांनी सांगितलं. हे प्रकरण द्रुतगती न्यायालयात चालवण्यात येईल असंही कुमार म्हणाले. पुणे शहरातील संवेदनशील ठिकाणी दिव्यांची सुविधा वाढवणार असल्याचं तसच महिला सुरक्षेसाठी अधिक सतर्क राहणार असल्याचं आयुक्तांनी सांगितलं. दरम्यान या आरोपीला आज न्यायालयात हजार करण्यात येणार आहे.

**एसटी**

एसटी स्थानके आणि आगारांमधील सर्व बस प्रवासी उतरल्यावर कुलुपबंद करण्याचे आदेश विभागातील 14 आगारांना पुणे विभाग नियंत्रकांनी दिले आहेत. स्वारगेट आगारात घडलेल्या अत्याचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षेबाबत आता प्रशासनाकडून काय उपाययोजना केल्या जाणार आहेत, याचा आढावा आज घेण्यात आला. याचे पालन होत आहे की नाही, हे पाहण्यास सुरक्षारक्षकांना सांगण्यात आले आहे. बेफिकीर चालक-वाहकांबाबत माहिती मिळाल्यावर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे पुणे विभाग नियंत्रक प्रमोद नेहुल यांनी सांगितले.

**PCMC**

महाराष्ट्र शासनाच्या 100 दिवसांचा कृती आराखडा उपक्रमात पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही सर्वोत्तम कामगिरी करणारी महापालिका ठरली आहे. राज्यभरातील महापालिकांचे आणि अन्य क्षेत्रीय कार्यालयांचे मूल्यमापन करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने 100 दिवसांचा कृती आराखडा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मध्यावधी आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली  घेण्यात आला. यावेळी आयुक्त शेखर सिंह यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

महानगरपालिका संचालनालयाने राज्यातील 22 महापालिकांपैकी सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या सहा महापालिकांची यासाठी निवड केली होती. त्यामध्ये अंतिम मूल्यमापनामध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेने प्रथम क्रमांक पटकावला आहे. ई-प्रशासन, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, स्वच्छता, अनावश्यक कार्यालयीन कागदपत्रांची विल्हेवाट, नाविन्यपूर्ण कार्यक्रम आणि आधुनिक सार्वजनिक तक्रार निवारण प्रणाली यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये सुधारणा केल्याने महापालिकेला हे यश प्राप्त झाले आहे.

**विज्ञान दिन**

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आज पुण्यातील शाळा, महाविद्यालयं आणि विविध संस्थांनी अनेक उपक्रमांचं आयोजन केलं आहे. या निमित्तानं पुण्यातील आयुका आणि पुण्याजवळच्या खोडद इथल्या जीएमआरटी या संस्थांना अनेक विद्यार्थी आणि विज्ञानप्रेमी नागरिक भेट देत आहेत.

**सहकार परिषद**

सहकारी बँकांची चांगली बाजू लोकांसमोर येणं गरजेचं आहे; असं मत राज्याचे सहकार आयुक्त आणि निबंधक दीपक तावरे यांनी पुण्यात व्यक्त केलं. पुणे नागरी सहकारी बँक संघटनेच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त आयोजित राज्यस्तरीय

परिषदेमध्ये ते बोलत होते. 'सहकारी बँकांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता' हा या परिषदेचा विषय होता. राज्याच्या विविध भागातील 350 बँकांच्या प्रतिनिधींनी यात भाग घेतला.

**हेमंत रासने**

कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांच्या फलकमुक्त कसब्याच्या निर्धाराला केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पाठींबा दिला असून भाजपा कार्यकर्त्यांनी अनधिकृत जाहिरात फलक लावू नयेत असं आवाहन केलं आहे. कसबा मतदारसंघात झालेल्या 'स्वच्छता नारायण महापूजा' कार्यक्रमात ते बोलते होते. राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त हेमंत रासने यांच्या संकल्पनेतून हा विशेष उपक्रम राबविण्यात आला.

**करसंकलन**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागानं मालमत्ता कर थकवणाऱ्या 877 मालमत्तांवर डिसेंबर 2024 ते फेब्रुवारी 2025 या कालावधीत जप्तीची कारवाई केली आहे. 10 फेब्रुवारीपर्यंत जप्त करण्यात आलेल्या 759 मालमत्तापैकी 321 मालमत्ताधारकांनी मालमत्ताकराची संपूर्ण थकीत रक्कम महानगरपालिकेकडे जमा केल्याने जप्त केलेल्या त्यांच्या मालमत्ता मुळ मालकाच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. उर्वरित 438 थकबाकीदार मालमत्ताधारकांकडून 25 फेब्रुवारी पर्यंत थकीत कर भरण्याची संधी देण्यात आली होती. या संधीचा लाभ घेऊन 36 मालमत्ताधाराकांनी थकीत कराचा संपूर्ण भरणा केला असून 36 मालमत्ताधारकांनी आंशिक भरणा केला आहे. उर्वरित, मालमत्ताधारकांच्या मालमत्तांची लिलावाची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

**पुरस्कार**

इस्त्राईलचे भारतातील कॉन्सुल जनरल कोब्बी शोषानी यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार 2025' नुकताच पुण्यात प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद आणि 'सूर्यदत्त'चे संस्थापक प्रा. संजय चोरडिया यांच्या हस्ते शोषानी यांचा सन्मान करण्यात आला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 35 तर किमान 17 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्याही साधारण असंच तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**